N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जळगाव  **P.S.(ठाणे):** रावेर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0344  **Year (वर्ष):** 2022

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**28/09/2022 01:21

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 27/09/2022
**Date To ( दिनांक पर्यंत):** 27/09/2022
**Time From (वेळेपासून):** 14:26 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:26 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 27/09/2022  **Time (वेळ):** 21:13 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 023
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/09/2022 21:13 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 01 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** रावेर शहरातील सावदा रोडवर,एस एस बिंबे अँन्ड सन्स पेट्रोल, पंपाचे बाजुस,रावेर,रावेर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** संदेश केशव पाटील
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1977
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन का )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 303,समध्दी पार्क,सुरभी नगर,भुसावळ,भुसावळ,रावेर,जळगाव,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | तळवेळ,भुसावळ,रावेर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुनिल रामदास खैरनार | | | 1. 03,गट न 33,एस एम आय टी कॉलेज जवळ जळगांव, मुक्ताईनगर,जळगांव,जळगांव, रावेर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 32,000 / रु . ( त्यात 2000 | 32,000.00 |

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु.)) |
|---|---|---|---|---|
| | | | / रुपये दराच्या 04 नोटा व 500 / रूपये दराच्या 48 नोटा ) | |

10 **Total value of property (In Rs/-) (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

32,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

यातील तक्रारदार यांनी एस . एस . बिंबे अँन्ड सन्स हा पेट्रोल पंप 11 महिन्याचा कायदेशीर करारनामा करुन , भाडेतत्वावर चालविण्यासाठी घेतलेला आहे . सदर पेट्रोल पंपाच्या मशीनची स्टॅम्पींग तपासणी नियंत्रक वैद्यमापन शास्त्र यांचे मार्फत शासकीय फि भरुन करावी लागते .

दि .14.09 .2022 रोजी यातील आलोसे यांनी पेट्रोल पंपाचे यापुर्वी मे महिन्यात केलेल्या स्टॅम्पींगचे कामाचे तसेच सप्टेंबर महिन्यात संपत आलेल्या गिल्बर्को कपनीचे मशीनची स्टॅम्पींगचे काम करुन तसे प्रमाणपत्र देण्याच्या मोबदल्यात तक्रारदार यांचेकडे 32,000 / रुपये लाच रकमेची मागणी केली त्या बाबत तकारदार यांनी दि 24.09.2022 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो , जळगाव कार्यालयाकडेस तक्रार दिली होती .

सदर तकारीची अँन्टी करप्शन ब्युरो , जळगांव पथकाने दि . 27.09.2022 रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता यातील नमुद आलोसे सुनिल रामदास खैरनार , निरीक्षक वैद्य मापन शास्त्र रावेर यांनी तक्रारदार यांचे पेट्रोल पंपावरील स्टॅम्पींगचे काम करुन देण्याच्या मोबदल्यात फिर्यादी यांचेकडेस पंचासमक्ष 32.000 / - रुपये लाच रकमेची मागणी करून सदर लाच रक्कम आलोसे यांनी वर नमुद तारीख , वेळी व ठिकाणी स्वतः स्विकारली .वैगरे म।।च्या फिर्याद वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन खबरी प्रत अधिकार असणारे मॅजि.सो.स्पेशल कोर्ट,भुसावळ यांना रवाना करण्यात आले आहे सदर गुन्हयाचे सविस्तर माहिती ई मेल /खास रिपोर्ट मा.वरिष्ठांना सादर करण्यात आले आहे.सोबत फिर्यादीने दिलेली टंकलिखीत तक्रार जोडलेली आहे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

shitalkumar jayvantrao naik

**Rank (पद):** SI (Sub-Inspector) **No.(क्र.):** psi

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमंलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): KAILASH MHATU NA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN64412

सी.आर.बी.) अन्वेषण फॉर्म - १)

# फिर्याद

रावेर पोलीस स्टेशन
दिनांक २७.०९.२०२२

**मी संदेश केशव पाटील, वय ४५ वर्षे, व्यवसाय व्यापार,रा. तळवेल,ता.भुसावळ. ह.मु. फ्लॅट नं ३०३, समृध्दी पार्क,सुरभी नगर,भुसावळ,ता.भुसावळ जि.जळगांव.**

समक्ष हजर राहुन तक्रार देतो की, मी वरील ठिकाणी माझी पत्नी शुभांगी पाटील, मुलगा लोकेश यांचेसह राहावयास असुन, मी व्यापार करुन उदरनिर्वाह करतो.

मी रावेर येथील मिलिंद सोमनाथ बिंबे यांचे मालकीचे एस.एस.बिंबे अॅन्ड संन्स हा पेट्रोल पंप ११ महिन्याचा करार करुन, भाडेतत्वावर चालविण्यासाठी घेतलेला आहे. त्याबाबत मी पेट्रोल पंप मालक मिलींद बिंबे यांचेशी दि.१७.०३.२०२२ रोजी कायदेशीर करारनामा केलेला आहे. त्या अनुषंगाने सदर पेट्रोल पंप चालविण्याची सर्व जबाबदारी माझेवर आहे. सदर पेट्रोल पंपाची गिल्बर्को कपंनीचे नोझल मशीनची स्टॅम्पींग तपासणी वजनमापे निरीक्षक यांचे मार्फत वर्षभरात शासकीय फि भरुन करावी लागते.

दि.१४.०९.२०२२ रोजी मी रावेर येथील भाडे तत्वावर चालविण्यास घेतलेल्या एस.एस.बिंबे अॅन्ड संन्स यांच्या पेट्रोल पंपावर श्री.खैरनार साहेब निरीक्षक, वजनमापे विभाग,रावेर हे आले होते. तेव्हा त्यांनी माझा पेट्रोल पंपावरील मॅनेजर अजय वाणी यांना सांगीतले की, तुझा मालक माझा फोन उचलत नाही, यापुर्वी मे महिन्यात स्टॅम्पींग केलेल्या कामाचा हिशोब क्लिअर करुन द्या तसेच तुमच्या पंपावरील गिल्बर्को कपंनीचे मशीनची स्टॅम्पींगची मुदत चालु महिन्यात संपणार आहे असे मॅनेजर यांना सांगीतले. त्यानंतर मॅनेजर यांनी मला या बाबत माहिती दिली. त्यानंतर मी श्री.खैरनार साहेब निरीक्षक, वजनमापे विभाग,रावेर यांचेशी फोनवर बोलणी केली. त्यावेळी त्यांनी मला मे महिन्यात स्टॅम्पींग केलेल्या कामाचा हिशोब जो पर्यत क्लिअर होत नाही तो पर्यत मी तुमचे पंपा संबधीत कोणतेही काम करणार नाही.तुमच्याकडे मे महिन्यात स्टॅम्पींग केलेल्या कामाच्या हिशोबाचे तसेच सध्याचे स्टॅम्पींगचे असे एकुण ३२,०००/–रुपये बाकी असुन उद्या कोणत्याही परिस्थीतीत पुर्ण हिशोब क्लिअर करुन द्या असे सांगीतले. त्यानंतर मी त्यांना ठिक आहे साहेब, असे सांगुन फोन कट केला.

त्यानंतर मी दि.१७.०९.२०२२ रोजी पेट्रोल पंपावरील गिल्बर्को कंपनीचे ४ नोझल मशिन यांची स्टॅम्पींगची मुदत संपलेली असल्याने सदर गिल्बर्को कंपनीचे नोझल मशिन स्टॅम्पींगची तपासणी करुन तसे प्रमाणपत्र मिळण्यासाठी २०,५००/– रुपये शासकिय चलन भरले होते. त्यानंतर दि.१९.०९.२०२२ रोजी सदर चलनाची पावती व अर्ज घेवुन मी नियंत्रक वैधमापन शास्त्र, रावेर या कार्यालयात सादर करण्यासाठी गेलो असता सदर कार्यालय हे बंद असल्याने त्या दिवशी अर्ज सादर करता आला नाही. सदर बाबत ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा लागतो असे समजले.

त्यानंतर मी दि.२२.०९.२०२२ रोजी सदर पेट्रोल पंपाची तपासणी करणेकामी नियंत्रक वैधमापन शास्त्र विभागाचे मैत्रेय या शासकीय वेब साईटवर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केलेला होता. त्यानंतर नियंत्रक वैधमापन शास्त्र, रावेर या कार्यालयाकडुन सदर पेट्रोल पंपावरील नोझल मशीनचे स्टॅम्पींग तपासणी दि.२७.०९.२०२२ रोजी करुन देण्यात येईल असे ऑनलाईन पध्दतीने कळविले होते.

तेव्हा नियंत्रक वैधमापन शास्त्र निरीक्षक श्री.खैरनार हे माझे पेट्रोल पंपावरील गिल्बर्को कंपनीचे ४ नोझल मशिन स्टॅम्पींगची तपासणीचे प्रमाणपत्र देण्याचे मोबदल्यात शासकिय फि २०,५००/– रुपये व्यतिरिक्त ३२,०००/–रु.लाचेची मागणी करीत असले बाबत मला समजले. माझी निरीक्षक श्री.खैरनार यांना ३२,०००/–रु.लाच रक्कम देण्याची मनापासुन इच्छा नाही, परंतु मी जर त्यांना लाच रक्कम दिली नाही तर ते माझे पेट्रोल पंपावरील गिल्बर्को कंपनीचे ४ नोझल मशिन स्टॅम्पींगची तपासणीचे प्रमाणपत्र देणार नाहीत म्हणुन मी निरीक्षक श्री.खैरनार यांना नाईलाजास्तव ३२,०००/–रु.लाच रक्कम देण्याचे कबुल केले होते.

त्यानुसार दि. २४.०९.२०२२ रोजी मी अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालय येथे येवुन निरीक्षक श्री.खैरनार हे माझे पेट्रोल पंपावरील गिल्बर्को कंपनीचे ४ नोझल मशिन स्टॅम्पींगची तपासणीचे प्रमाणपत्र देण्याचे मोबदल्यात शासकिय फि २०,५००/– रुपये व्यतिरिक्त ३२,०००/–रु.लाचेची मागणी केली त्या बाबत मी तक्रार देत आहे. तरी त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे.

दि.२७.०९.२०२२ रोजी सकाळी श्री. खैरनार निरीक्षक, वजनमापे विभाग,रावेर हे एस.एस.बिंबे अॅन्ड संन्स रावेर येथील पेट्रोल पंपावर गिल्बर्को कंपनीचे ४ नोझल मशिन स्टॅम्पींगची तपासणीचे कामासाठी येणार असल्याने मी त्यांची भेट घेउन लाचे संबधी बोलणी करणार आहे.

माझा श्री.खैरनार, निरीक्षक, वजनमापे विभाग,रावेर यांचेशी कोणत्याही प्रकारचा आर्थिक देवाण घेवाण अथवा उसनवारीचा व्यवहार नाही. अथवा त्यांच्याशी माझा कोणत्याही प्रकारचा वैरभाव अगर वैमनस्य नाही बाबत स्वहस्ताक्षरात तक्रार लिहुन दिली आहे.

त्यानंतर जाधव मॅडम हया दोन शासकीय पंच व स्टॉपसह सापळा कारवाईसाठी रावेर येथील एका बंद पेट्रोल पंपाजवळ हजर झाले. त्यानंतर जाधव मॅडम यांनी त्यांचे कडेस असलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखविले व त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर जाधव मॅडम यांनी मला व पंच क्रं.१ अशांना पुन्हा सुचना देवुन सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे गळयात लटकवुन दिले. त्यानंतर जाधव मॅडम यांनी मला पंच क्रं.१ यांचेसह रावेर येथील एस.एस.बिंबे अॅन्ड संन्स हया पेट्रोल पंपावर श्री.खैरनार,निरीक्षक वजनमापे विभाग,रावेर यांची भेट घेण्यासाठी माझे कारने पाठविले होते. तेव्हा मी पंच क्रं १ यांचेसह रावेर येथील एस.एस.बिंबे अॅन्ड संन्स हया पेट्रोल पंपावर गेलो. त्यानंतर मी माझी कार पेट्रोल पंपाच्या आवारात उभी केली. त्यानंतर मी व पंच क्रं.१ असे पेट्रोल पंपाच्या आवारात गेलो असता तेव्हा तेथे

पोलीस ठाणे अंमलदार
रावेर पो.स्टे

आमचे अगोदरच श्री.खैरनार,निरीक्षक हे सदरील पेट्रोल पंपावर हजर असल्याचे आम्हास दिसले. तेव्हा त्यांची व माझी भेट झाली. तेव्हा माझेत व श्री.खैरनार,निरीक्षक यांचेत माझे पेट्रोल पंपाचे गिल्बर्को कपंनीचे मशीनची स्टॅम्पींगचे काम करुन तसे प्रमाणपत्र देण्याबाबत चर्चा झाली. तेव्हा श्री.खैरनार, निरीक्षक यांनी मला मी माझ्या मापाने स्टॅम्पींग करेल, तुम्हाला काही प्रॉब्लेम असला तर बोलायचं, त्यावेळी मी त्यांना क्वार्टर आता संपला न साहेब, तेव्हा त्याने अस कस मे मध्ये स्टॅम्पींग केलं म्हणजे क्वार्टर झाल, क्वार्टर तीस जुन ला संपले आहे असे सांगुन त्यांनी पर क्वार्टर सहा हजार रुपये असे एकूण २४,०००/—रुपये सांगीतले. तसेच मी चार नोझल स्टॅम्पींग करायचे तिन घेतो पण तुमच्याकडून दोन हजार याप्रमाणे आठ हजार रुपये द्यावे लागतील असे सांगुन, त्यांनी माझ्याकडे ३२,०००/— रुपये लाच रक्कम मागणी करुन सदर लाच रक्कम स्विकारण्यास संमती दिली. तेव्हा मी श्री.खैरनार,निरीक्षक यांना दहा पंधरा मिनिटात येतो असे सांगुन मी व पंच क्र.१ असे सापळा पथकाजवळ मोटर सायकल ने परत आलो होतो. त्यानंतर माझे व श्री.खैरनार,निरीक्षक यांचे मधील संभाषण दोन्ही पंचानी व जाधव मॅडम यांनी ऐकले.तेव्हा दोन्ही पंच व जाधव मॅडम यांची लाचमागणी बाबत खात्री झाल्याने व वेळ कमी असल्याने जाधव मॅडम यांनी पुढील सापळा कार्यवाही सलगपणे करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर श्री.खैरनार,निरीक्षक यांना देण्यासाठी मी माझे घर खर्चामधुन आणलेली ३२,०००/—रू. रक्कम (त्यात २०००/— रुपये दराच्या ०४ चलनी नोटा व ५००/—रू.दराच्या ४८ चलनी नोटा) जाधव मॅडम यांचे समक्ष हजर केली. तेव्हा जाधव मॅडम यांचे सुचनेनुसार पोकॉ/सचिन चाटे यांनी सदर नोटांना अ.पावडर लावुन सदरच्या नोटा माझे शर्टचे पुढील डाव्या बाजुच्या खिश्यात अलगद ठेवुन दिल्या होत्या. त्यानंतर जाधव मॅडम यांनी मला व पंच क्र.१ अशांना पुन्हा महत्वाच्या सुचना दिल्या. त्यानंतर जाधव मॅडम यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये पुन्हा नविन मेमरी कार्ड टाकुन सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला पंच क्र.१ यांचेसह श्री.खैरनार,निरीक्षक यांनी मागणी केल्या प्रमाणे ३२,०००/— रुपये लाच रक्कम देण्यासाठी रावेर ते सावदा रोडवरील एस.एस.बिंबे या पेट्रोल पंपावर मोटार सायकलने पाठवले होते. त्यानंतर मी पंच क्र.१ यांचे सह रावेर ते सावदा रोडवरील एस.एस.बिंबे या पेट्रोल पंपावर गेलो. मी माझी मोटार सायकल एस.एस.बिंबे या पेट्रोल पंपाच्या आवारात उभी केली. तेव्हा जाधव मॅडम यांनी रावेर ते सावदा रोडवरील एस.एस.बिंबे या पेट्रोल पंपाच्या आजुबाजुस सापळा लावला होता. तेव्हा श्री.खैरनार,निरीक्षक हे मी व पंच क्र.१ असे उभे असलेल्या ठिकाणी आले.

तेव्हा माझी श्री.खैरनार,निरीक्षक यांचेशी भेट झाली. तेव्हा श्री.खैरनार,निरीक्षक यांनी मला तुम्हाला फोन करतो,तुम्ही फोनच घेत नाही,दे नंतर कोणी पाहील,गाडीत बसु,नाहीतर तिकडे चला,किती हे ते आता असे सांगुन पैशांची मागणी केली. तेव्हा मी माझे शर्टचे वरील डाव्या बाजुच्या खिश्यात असलेली लाच रक्कम ३२,०००/—रु. उजव्या हाताने बाहेर काढून बत्तीस हे ना ते दादा, कमी करा असे एक दोन हजार रुपये मला तेवढच असे सांगुन सदर लाच रक्कम श्री.खैरनार,निरीक्षक यांचे समोर धरली असता श्री. खैरनार,निरीक्षक यांनी सदर लाचेची रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे पॅन्टच्या उजव्या बाजुच्या पुढील खिश्यात ठेवुन घेतली. त्यानंतर मी ठरवुन दिल्या प्रमाणे सापळा पथकास ईशारा केला. तेव्हा जाधव मॅडम व सापळा पथक यांनी श्री.खैरनार,निरीक्षक यास रंगेहाथ पकडले. त्यांनतर जाधव मॅडम यांचे सुचने नुसार माझे गळयातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन ते बंद केले. तेव्हा जाधव मॅडम यांनी श्री.खैरनार,निरीक्षक यांना त्यांची व सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर जाधव मॅडम यांनी श्री. खैरनार,निरीक्षक यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव सुनिल रामदास खैरनार, वय ५६, व्यवसाय नोकरी,निरीक्षक वैध मापन शास्त्र रावेर ता.रावेर,जि.जळगाव रा.प्लॉट नं ०३ गट नं ३३ एस.एम.आय.टी. कॉलेज जवळ, मुक्ताईनगर, जळगांव असे सांगितले. त्यानंतर सापळा पथकाने श्री.खैरनार,निरीक्षक यांना ताब्यात घेतले.

त्यानंतर पुढील कारवाई अँन्टी करप्शन ब्युरो जळगांव कार्यालय येथे जावुन करण्यात आली. सदर कार्यालयातील एका रुममध्ये श्री.खैरनार,निरीक्षक यांचे व माझे दोन्ही पंचाच्या हातांची अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या प्रकाशात तपासणी केली. त्यानंतर पुढील उर्वरीत सापळा कारवाई केली आहे. तसा पंचनामा केला आहे.

तरी आरोपी सुनिल रामदास खैरनार, निरीक्षक वैधमापन शास्त्र विभाग रावेर यांनी स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून दि.२७.०९.२०२२ रोजी पंचासमक्ष माझे पेट्रोल पंपाचे यापुर्वी मे महिन्यात केलेल्या स्टॅम्पींगचे कामाचे तसेच सप्टेंबर महिन्यात संपत आलेल्या गिल्बर्को कपंनीचे मशीनची स्टॅम्पींगचे काम करुन तसे प्रमाणपत्र देण्याच्या मोबदल्यात माझे कडेस ३२,०००/—रुपये लाच रकमेची मागणी केली व सदर लाच रक्कम आरोपी सुनिल रामदास खैरनार,निरीक्षक वैधमापन शास्त्र विभाग रावेर यांनी दि.२७.०९.२०२२ रोजी १४.२६ वा. रावेर शहरातील सावदा रावेर रोडवरील एस.एस.बिंबे अॅन्ड सन्स पेट्रोल पंपाचे बाजुस असलेल्या मोकळया जागी स्वत: पंचासमक्ष स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील नमुद फिर्याद मी सांगितल्या प्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असुन ती मी वाचुन पाहीली ती मी सांगितल्या प्रमाणे टंकलीखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

समक्ष

फिर्यादीची सही

एन. एन. जाधव
पोलीस निरिक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव